1) सकाळ पू. पान क्र. 2

दि. 25/01/2023

# सराईत गुन्हेगारांची पोलिस ठाण्यात यादी

## पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांची माहिती; चोरीस गेलेली रक्कम, मुद्देमाल संबंधितांना सुपूर्द

भाईंदर, ता. २४ (बातमीदार) : गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील जास्त गुन्हेगारी करणाऱ्या आणि परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या अव्वल दहा गुन्हेगारांची यादी तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहेत. त्या सर्वांवर कडक कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी दिली.

पोलिस आयुक्तालयाच्या परिमंडळ एक अंतर्गत सहा पोलिस ठाण्यात चोरीला गेलेला एक कोटीहून अधिक किमतीचा मुद्देमाल संबंधितांना नुकताच परत करण्यात आला. या वेळी आयुक्तांनी सांगितले की, गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याचा यशस्वी तपास होऊन मुद्देमाल जप्त करणे महत्त्वाचे असते. तसेच त्यातही जप्त केलेला मुद्देमाल संबंधित व्यक्तीला परत करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. गृहमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार २०२३ मध्ये गुन्ह्याचा यशस्वी तपास करून मुद्देमाल संबंधित व्यक्तींना लवकरात लवकर परत करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाण्यांना तशा सूचना देण्यात आल्या असल्याचे आयुक्तांनी सांगितले.



**भाईंदर :** पोलिस आयुक्तालय परिमंडळ एकमार्फत चोरीस गेलेला मुद्देमाल संबंधितांना सुपूर्द करण्यात आला.

### ५१ गुन्हे दाखल

मिरा-भाईंदरमधील सहा पोलिस ठाण्यांमध्ये २०२२ व २०२३ मध्ये घरफोडी व गंभीर चोरी यासारखे ५१ गुन्हे दाखल झाले होते. या गुन्ह्यांचा तपास करून चोरीला गेलेला मुद्देमाल गुन्हेगारांकडून हस्तगत केला आहे. त्यात तीन चारचाकी वाहने, तीन रिक्षा, आठ दुचाकी, १५ मोबाईल, सोन्याचे दागिने, रोख रक्कम व अन्य मौल्यवान वस्तूंचा समावेश असून त्याची किंमत एक कोटी सात लाख ५१ हजार १८० इतकी आहे. यावेळी आयुक्त मधुकर पांडे, उपायुक्त जयंत बजबळे तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

2) पुण्यनगरी पान क्र. 3

# श्रद्धा हत्याकांड: आफताबविरोधात पोलिसांचे ६,६२९ पानांचे आरोपपत्र

**। नवी दिल्ली :** देशातील बहुचर्चित श्रद्धा वालकर हत्याकांडप्रकरणी मंगळवारी दिल्ली पोलिसांनी आरोपी आफताब पुनावालाविरोधात ६,६२९ पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. यावेळी आफताबने आपला वकील बदलण्याची मागणी केली. तर न्यायालयाकडून आफताबची कोठडी दोन आठवड्यांनी वाढवण्यात आली. याप्रकरणी पुढील सुनावणी ७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

आफताबवर त्याची लिव्ह इन पार्टनर श्रद्धाची हत्या केल्याचा आणि तिच्या मृतदेहाचे तुकडे करून त्यांची विल्हेवाट लावल्याचा आरोप आहे. याप्रकरणी मंगळवारी साकेत न्यायालयातील महानगर न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले. हे आरोपपत्र किती पानांचे आहे, असे न्यायाधीश अविरल शुक्ला यांनी विचारले



असता तपास अधिकाऱ्यांनी ६,६२९ पानांचे असल्याचे उत्तर दिले. यावर न्यायाधीशांनी हे तर फार मोठे असल्याची प्रतिक्रिया दिली. तसेच अखेर तुम्ही आरोपपत्र दाखल तर केले, असेही न्यायाधीश म्हणाले. तिहार तुरुंगात न्यायालयीन कोठडीत असलेला आफताब व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून या सुनावणीत सहभागी झाला होता. त्याने आपले वकील एम. एस. खान यांना बदलण्याची मागणी केली. तसेच आरोपपत्राची प्रत आपल्या वकिलांऐवजी आपल्याला देण्यात यावी, अशी न्यायालयाला विनंती केली. यावर न्यायाधीशांनी पुढील सुनावणीत आरोपपत्राची प्रत देणार असल्याचे आफताबला सांगितले. तसेच त्याच्या न्यायालयीन कोठडीत दोन आठवड्यांची वाढ केली. याप्रकरणी पुढील सुनावणी ७ फेब्रुवारी रोजी होईल.

यानंतर दिल्ली पोलिसांच्या सहआयुक्त मीनू चौधरी यांनी पत्रकार परिषद घेतली. आफताबने श्रद्धाची हत्या करण्यापूर्वी ती तिच्या मित्राला भेटण्यासाठी गेली होती. श्रद्धाने इतर कोणाशीही मैत्री करू नये, असे आफताबचे म्हणणे होते. याच मुद्द्यावरून दोघांमध्ये भांडण झाले आणि आफताबने श्रद्धाची गळा दाबून हत्या केली, अशी माहिती चौधरी यांनी दिली. आफताबची पॉलीग्राफ व नार्को चाचणी करून घटनाक्रम जाणून घेण्यात आला. जंगलात सापडलेली मानवी हाडे श्रद्धाचीच असल्याचे डीएनए चाचणीतून स्पष्ट झाले आहे.

CS CamScanner
CS CamScanner

3) पुढारी पान क्र. 3

दि. 25/01/2023

# आणणा पॅलेस ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई

**मीरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेच्या आण्णा पॅलेस ऑर्केस्ट्रा बार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाने कारवाई करून ११ व्यक्तिंविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकास माहिती मिळाली की, आण्णा पॅलेस ऑर्केस्ट्रा बार, गोडदेव रोड, नवघर, भाईंदर पूर्व या बारच्या हॉलमध्ये महिला सिंगरच्या नावाखाली परवाना नसतांना मुलींकडुन नृत्य करवून घेतले जात होते. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी त्या बारमध्ये पोलीस पथकासह छापा मारला. बारमध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावर महिला सिंगर अश्लिल नृत्य करत असल्याचे निदर्शनास आले. या कारवाईमध्ये रोख रक्कम १०,५२० रु व चित्रीकरण केलेली क्लीप जप्त करून त्या बार आस्थापनेचे, कॅशियर, चालक, स्टीवर्ड ३, वेटर ५, सिंगर वादक १ असे एकुण ११ व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच आरोपी मालक व तपासात निष्पन्न होणारे इतर चालक यांच्याविरुध्द नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ प्रमाणे नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

4) पुढारी पु. पान क्र. 3

# डॉक्टर, आरोग्य कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

पालिकेच्या आरोग्य विभागाने सरळ सेवा भरतीमधून पालिका रुग्णालयासाठी डॉक्टर व कर्मचारी यांची रितसर भरती केलेली नाही. पालिकेची पाच रुग्णालये असली तरी डॉक्टर व कर्मचारी मात्र कंत्राटीच आहेत. त्यांचे तीन महिन्याचे वेतन रखडले आहेत. त्यामुळे त्यांनी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या दालनासमोर आंदोलन केले.

पालिकेच्या वैद्यकीय सेवेत हे डॉक्टर व कर्मचारी कोरोना काळात निर्माण झालेल्या गरजेनुसार पालिकेने भरती केले होते. वैद्यकीय सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांना तेव्हापासून कंत्राटदाराकडून डॉक्टर व परिचारिकांना मागील तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. तेव्हा या आंदोलनानंतर पालिकेने तात्काळ त्यांचे रखडलेले वेतन देण्याचे मान्य केले. २०२१ पासून कोरोनाची साथ होती. पालिकेने त्या वेळची गरज ओळखून आधीच्या आरोग्य केंद्रांबरोबरच नवी दोन रुग्णालये उघडली होती. त्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता पूर्ण केली गेली. तेव्हा पालिकेत थेट आरोग्य सेवेत भरती प्रक्रिया सुरु होती. वैयक्तिक कंत्राटी पद्धतीने डॉक्टर, परिचारिका आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. श्रेणीनुसार वेतन देण्यात येत होते. मात्र ऑक्टोबर २०२२ पासून त्यांना वेतनच देण्यात आले नव्हते. यामुळे हे डॉक्टर्स आणि कर्मचारी हवालदिल झाले होते.

ज्या काळात सर्वत्र टाळेबंदी होती. त्यावेळी आम्ही आमचे जीव धोक्यात घालून नागरीकांना आरोग्य सेवा दिली. पालिकेने आम्हाला चांगल्या वेतनाचे तसेच कायम करण्याचे आश्वासन दिले. मात्र मागील तीन महिन्यांपासून वेतनच देण्यात आले नसल्याचे या आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या बाबत माहिती देताना पालिकेचे उपायुक्त डॉ.विजयकुमार द्वासे यांनी सांगितले की, या वैद्यकीय विभागातील वेतनाची बाब आस्थापनाकडे प्रलंबित होती. पालिकेचा आकृतीबंध २०१४ रोजी मंजूर होता. नंतर विविध कारणांमुळे तो मंजूर झाला नसल्याने या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत धोरण नव्हते, त्यामुळे ही समस्या उद्भवली होती. परंतु आता या तुटी दूर झाल्या असून त्यांना थकीत वेतन देण्यात येत आहे. हे सर्व वैयक्तिक कंत्राटी कर्मचारी असल्याने त्यांना कायम करण्यात येणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

CS CamScanner

दि. 25/01/2023

5) लोकसत्ता पू. पान क्र. 1

6) म.टा. पान क्र. 9

# रिक्षाचालकांचा आज बंद

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** रिकॅलिब्रेशन (मीटर बदल) न करून घेतलेल्या रिक्षाचालकांना परिवहन विभागाकडून प्रति दिन ५० रुपये इतका दंड आकारला जात आहे. याविरोधात पालघर जिल्ह्यासह वसई, विरार शहरातील रिक्षा व टॅक्सीचालक आक्रमक झाले असून बुधवारी जिल्ह्यात रिक्षा व टॅक्सी बंदचे आंदोलन पुकारले आहे.

नव्या दराप्रमाणे दर आकरणी करण्यासाठी ऑटो रिक्षाचे मीटर रिकॅलिब्रेशन (मीटर बदल) करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने दिलेली मुदत निघून गेली आहे. त्यामुळे आता मीटर रिकॅलिब्रेशन न करून घेतलेल्या रिक्षाचालकांना प्रति दिन ५० रुपये इतका दंड आकारला जाऊ लागला आहे. वसई, विरार शहरात जवळपास २५ हजारहून अधिक रिक्षा चालतात. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वसई क्षेत्रात शेअरप्रमाणे रिक्षा भाडे आकारले जाते. तसेच पालघर जिल्ह्यातील सर्व भाडे शहरे रिक्षाप्रमाणे यापूर्वीच मंजूर करण्यात आले असून अजूनही २३ रुपयेप्रमाणे दरवाढ लागू करण्यात आलेली नाही. त्यामुळे पूर्वी निश्चित केलेले भाडे आकारले जात आहे. त्यामुळे इथे मीटरमध्ये बदल तातडीची गरज नसल्याचे येथील रिक्षाचालकांनी सांगितले आहे. मात्र ज्यांनी रिकॅलिब्रेशन करून घेतले नाही त्यांना आता परिवहन विभागाकडून प्रति दिन ५० रुपये दंड आकारला जाऊ लागला आहे. त्यामुळे रिक्षाचालकांना आर्थिक फटका बसू लागला आहे. त्यामुळे आकारण्यात येत असलेला दंड रद्द करावा या मागणीसाठी बुधवारी वसई-विरारसह पालघर जिल्ह्यातील रिक्षाचालक व टॅक्सीचालक यांनी बंद आंदोलन पुकारले आहे. वसईतील २५ ते ३० विविध रिक्षा संघटना, सामाजिक संघटना या संपात सहभागी होणार असल्याचे चालक मालक महासंघाचे अध्यक्ष विजय खेतले यांनी सांगितले आहे.

### प्रवाशांचे हाल होणार

वसई विरार शहरातील बहुतांश नागरिक हे रिक्षातून प्रवास करतात. परंतु शहरातील रिक्षाचालकांनी बुधवारी रिक्षा बंद आंदोलन पुकारले असल्याने याचा मोठा फटका प्रवाशांना बसणार आहे. त्यातच सणासुदीचे दिवस असल्याने मोठ्या संख्येने नागरिक बाहेर पडतात. मात्र रिक्षा बंद झाल्यास त्यांनाही याचा फटका बसणार आहे.

# 'माझ्या अटकेचे लक्ष्य पांडे यांना दिले होते'

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा मविआवर हल्लाबोल

वृत्तसंस्था, मुंबई



'मला अटक करण्याचे लक्ष्य मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त संजय पांडे यांना तत्कालीन महाराष्ट्र विकास आघाडीच्या सरकारने दिले होते; मात्र मी काहीही गैर केलेच नसल्याने त्यांना मला अटक करताच आली नाही', असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मविआवर हल्लाबोल केला.

येथील एका कार्यक्रमात बोलताना फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री व त्यांच्या तत्कालीन सरकारवर जोरदार टीका केली. 'त्यांच्या सरकारच्या काळात, काहीही करून मला कुठल्यातरी प्रकरणात अडकवा, माझ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा, मला गजांआड पाठवा, असे आदेशच पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. संजय पांडे यांच्यासमोर तसे लक्ष्यच ठेवले होते. मात्र मला अटक करणे त्यांना शक्य झाले नाही', असे फडणवीस म्हणाले. 'तुम्ही याबाबत पोलिस अधिकाऱ्यांनाही विचारू शकता', अशी पुस्ती त्यांनी जोडली.

'सन २०१९ मधील विधानसभा निवडणुकांनंतर शिवसेनेच पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझे फोनही घेणे बंद केले होते. त्यांना जर आमच्यासोबत युती नको होती, तर त्यांनी तसे मला स्पष्ट सांगायला हवे होते. अर्थात असे असले तरी मला व्यक्तिशः उद्धव यांच्याबाबत मनात कुठलाही आकस, राग नाही', असे फडणवीस यांनी नमूद केले. 'मध्यंतरी एका कार्यक्रमात रश्मी ठाकरे यांची भेट झाली. तेव्हाही मी त्यांच्याकडे उद्धव यांची विचारपूस केली, त्यांना सदिच्छा कळवा, असे सांगितले. अशा प्रकारे वागणे ही महाराष्ट्राची राजकीय संस्कृती आहे आणि मी त्या संस्कृतीचे उल्लंघन करू इच्छित नाही', असे फडणवीस पुढे म्हणाले.

CamScanner
CamScanner

दि. 25/01/2023

7) पुण्यनगरी पु: पान क्र. 1

## काशिमीरा येथे २० लाखांचे मॅफेड्रोन जप्त

। मीरा रोड । काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत जवळपास २० लाखांचे मॅफिड्रोन हे अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन आलेल्या व्यक्तीला अटक करून अमली पदार्थ विक्री कक्षाने अटक केली.अमली पदार्थ विक्री कक्षाला काशिमीरा येथील सगनाय देवी मंदिराच्या डाव्या बाजूच्या रस्त्यावर एकजण अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने त्या ठिकाणी सापळा रचून २२ जानेवारी रोजी पहाटे तीनच्या सुमारास एकाला ताब्यात घेतले. त्या वेळी त्याची चौकशी केली असता फहिम करिम खान (५४) असे त्याने नाव सांगितले. या वेळी त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे ९८ ग्रॅम वजनाचे १९ लाख ६० हजार रुपये किमतीचे मॅफिड्रोन हे अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन आल्याचे आढळून आले. त्याच्या विरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

8) पुढारी पु: पान क्र. 3

# काँग्रेसची विचारधाराच देशाला अखंड ठेवणार

## काँग्रेस प्रदेश सरचिटणीस भावना जैन यांचे प्रतिपादन

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना गेल्या ७० वर्षात सर्वांगीण विकासाबरोबरच देशाला अखंड ठेवण्याचे काम काँग्रेसनेच केल्याचे हे द्योतक ठरत आहे. यामध्ये महात्मा गांधींची सर्व धर्म समभाव हि विचारधाराच सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन काँग्रेस प्रदेश सरचिटणीस तथा मिरा-भाईंदर मधील प्रभारी भावना जैन यांनी केले.



जैन यांनी मिरा-भाईंदर शहराला भेट दिली असता त्यावेळी मीरा रोडच्या नयानगरमधील पक्ष कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी भाजपच्या रणनितीवर टिका केली. देशात सध्या वेगळ्या विचारधारेचे लोकं सत्तेवर आल्याने त्यांनी लोकशाहीची व्याख्या बदलल्याचा आरोप भाजपवर केला. गांधी व गोडसे यांच्यावर आधारित दि गांधी मर्डर या चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे. त्यावर केंद्र सरकार मूग गिळुन बसले असून ते गांधीजींची हत्या करणाऱ्या गोडसे यांना प्रमोट करीत आहेत. केंद्र सरकार धर्माचे राजकारण करण्यात व्यस्त आहे. यामुळे लोकशाहीला धोका निर्माण होत आहे, तर राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेद्वारे देश अखंड ठेवण्याचा संदेश लोकांनां दिला जात आहे. या यात्रेची सांगता लवकरच काश्मीर मध्ये होणार असून त्यानंतर प्रजासत्ताक दिनापासून देशपातळीवर हाथ से हाथ जोडो अभियान काँग्रेसमार्फत सुरु केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. भाजप म्हणजे भ्रष्ट जुमला पार्टी असून, त्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे उद्योग धंदे बंद होत असल्याने देशात बेरोजगारी, महागाई वाढली आहे. उद्योगपतींच्या इशाऱ्यावर देश चालत असून गोरगरीब जनता नाहक भरडली जात असल्याची टिका त्यांनी केली. मीरा-भाईंदरमधील काँग्रेसबाबत बोलताना त्यांनी स्थानिक काँग्रेसला माजी आमदार मुझफ्फर हुसैन यांच्या माध्यमातून अभ्यासू नेतृत्व लाभले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस मजबूत होत असल्याचा दावा त्यांनी केला.

CamScanner

CamScanner

# काशिमिरा येथून २० लाखांचे एमडी जप्त

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

## अंमली पदार्थविरोधी पथकाची कारवाई

मिरा-भाईंदर पोलिसांच्या अंमली पदार्थविरोधी पथकाने काशिमिरा परिसरातून २० लाख रुपयांचा एमडी या अंमली पदार्थांचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी ५४ वर्षीय व्यक्तीविरोधात काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशिमिरा परिसरात शनिवारी अंमली पदार्थविरोधी पथकाचे अधिकारी गस्त घालत असताना, एक संशयित व्यक्ती दिसून आली. त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे ९८ ग्रॅम वजनाचा २० लाख रुपयांचा मॅफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ आढळला. त्यामुळे त्याच्याविरोधात काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फरीम खान (५४) असे त्याचे नाव असून तो नालासोपारा परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

CamScanner

26 जनवरी को शिवाजी पार्क नो फ्लाई जोन घोषित
..पेज-3

राष्ट्रीय हिन्दी दैनिक
MHT
मुंबई हिंदमाता टाइम्स

रिया चक्रवर्ती ने बिना पैंट सिर्फ स्वेटर में शेयर की तस्वीरें
..पेज-6

मुंबई, बुधवार 25 जनवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| संवत् 2079, माघ शुक्ल पक्ष चतुर्थी | 07.15 am / 06.27 pm | | अधिकतम 28°C / न्यूनतम 22°C | NSE / BSE | |

# महिलाएं अपने सामान की सुरक्षा खुद करें- पुलिस

## ■ बाहर जाते समय अपने मंगलसूत्र का खुद रखें ध्यान
## ■ एमबीवीवी पुलिस की महिलाओं से अपील

**MHT संवाददाता**
राकेश सिंह

नालासोपारा। किसी भी पुलिस की जिम्मेदारी होती है नागरिकों और उनके सामान की सुरक्षा करना, लेकिन एमबीवीवी पुलिस ने अपनी जिम्मेदारी से पल्ला झाड़ते हुए यह जिम्मेदारी लोगों पर ही थोप दी है। एमबीवीवी पुलिस का कहना है कि जब भी महिलाएं बाहर निकलें तो अपने मंगलसूत्र और गहनों को ढक कर निकलें, ताकि चेन स्नैचर उनके गहने पर हाथ ना साफ कर सकें। दरअसल पीछले कुछ वर्षों से क्षेत्र में चैन स्नैचिंग के मामलों में बढ़ोतरी हुई है।



> **पुलिस की लोगों से अपील**
> मॉर्निंग वॉक या बाजार जाने वाले लोगों को कम से कम ज्वेलरी पहननी चाहिए। साथ ही गले में दुपट्टा या मफलर रखने से चेन स्नेचिंग को रोका जा सकता है और यह सबसे अच्छा विकल्प है। घटना होने पर तुरंत 112 नंबर पर फोन करें, स्थानीय थाने आएं या मोबाइल फोन पर तुरंत संपर्क करें, ताकि नाकाबंदी या अगले पुलिस स्टेशन को सूचना दी जा सके।
> \- एमबीवीवी पुलिस

### सोना बना लोगों के जान का दुश्मन

पुलिस का कहना है कि यह समय महिलाओं के लिए खुद जागरूक होने, अपनी रक्षा करने और अपने गहनों की सुरक्षा करने का है, क्योंकि चेन स्नैतर आप की वर्षो की कमाई पर पल भर में हाथ साफ कर जाते हैं। पिछले एक साल में चेन स्नेचरों ने लाखों रुपए के सोने की चोरी की है। ऐसे में एक सवाल खड़ा हो गया है कि क्या महिलाओं को सोना पहनना चाहिए या नहीं। हालांकि सोने की कीमत रोजाना आसमान छू रही है, सोना खरीदने वाले ग्राहकों की संख्या में कमी नहीं आई है, लेकिन यह सोना अब जानलेवा हो गया है।

### किस साल में कितनी हुई चेन स्नेचिंग की घटनाएं

1) 2021 मामले दर्ज - 101 खुलासा - 75

2) 2022 मामले दर्ज - 35 खुलासा - 20

### धूम स्टाइल में बाइक चलाकर कई अपराध

कई अपराधों से पता चला है कि ज्यादातर संदिग्ध चोर सुनसान सड़कों पर चलने वाले वरिष्ठ नागरिक, महिलाओं और युवतियों को ही आपना शिकार बनाते हैं। चेन स्नेचर धूम फिल्म की तरह तेज गति में दोपहिया वाहन चलाने और लोगों के गले से आभूषण खींचने के कई अपराधों को अंजाम देते हैं।

CamScanner

# १ कोटींच्या वस्तू मूळ मालकांकडे



म. टा. वृत्तसेवा,मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमधील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत मागील वर्षभरात सोनसाखळीचोरी, दुचाकीचोरी तसेच चोरीच्या इतर गुन्ह्यांची उकल पोलिसांकडून करण्यात आली आहे. या चोरट्यांकडे आढळलेला एक कोटी रुपयांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल संबंधित फिर्यादींना पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते सोमवारी हस्तांतरित करण्यात आला.

मागील वर्षभरात मिरा रोड, काशिमिरा, नवघर, उत्तन, भाईंदर या पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दुचाकीचोरी, सोनसाखळीचोरी व इतर अनेक गुन्हे घडले आहेत. यातील ५१ गुन्ह्यांची उकल करण्यात प्रशासनाला यश आले आहे. यावेळी तपास करताना चोरट्यांकडून चोरीचा एक कोटी सात लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. चोरट्यांकडून हस्तगत केलेल्या या वस्तू संबंधित प्रकरणातील फिर्यादींना मिरा रोडच्या कनकिया येथील एका हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात हस्तांतरित करण्यात आल्या. यात तीन चारचाकी वाहने, तीन रिक्षा, आठ दुचाकी वाहने, १५ मोबाइल, सोन्याचे दागिने व इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश होता. यावेळी उपायुक्त जयंत बजबळे व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

CS CamScanner

सकाळ

# सराईत गुन्हेगारांची पोलिस ठाण्यात यादी

## ोलिस आयुक्त मधुकर पांडे यांची माहिती; चोरीस गेलेली रक्कम, मुद्देमाल संबंधितांना सुपूर्द

भाईंदर, ता. २४ (बातमीदार) : न्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी त्येक पोलिस ठाण्याच्या ार्यक्षेत्रातील जास्त गुन्हेगारी रणाऱ्या आणि परिसरात दहशत ार्माण करणाऱ्या अव्वल दहा न्हेगारांची यादी तयार करण्याचे ाम सुरू करण्यात आले आहेत. त्या ांवर कडक कारवाई केली जाणार ाहे, अशी माहिती मिरा-भाईंदर सई-विरार पोलिस आयुक्त मधुकर ांडे यांनी दिली.

पोलिस आयुक्तालयाच्या रिमंडळ एक अंतर्गत सहा पोलिस ाण्यात चोरीला गेलेला एक कोटीहून ाधिक किमतीचा मुद्देमाल संबंधितांना नुकताच परत करण्यात आला. या वेळी आयुक्तांनी सांगितले की, गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याचा यशस्वी तपास होऊन मुद्देमाल जप्त करणे महत्त्वाचे असते. तसेच त्यातही जप्त केलेला मुद्देमाल संबंधित व्यक्तीला परत करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. गृहमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार २०२३ मध्ये गुन्ह्याचा यशस्वी तपास करून मुद्देमाल संबंधित व्यक्तींना लवकरात लवकर परत करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाण्यांना तशा सूचना देण्यात आल्या असल्याचे आयुक्तांनी सांगितले.



भाईंदर : पोलिस आयुक्तालय परिमंडळ एकमार्फत चोरीस गेलेला मुद्देमाल संबंधितांना सुपूर्द करण्यात आला.

### ५१ गुन्हे दाखल

मिरा-भाईंदरमधील सहा पोलिस ठाण्यांमध्ये २०२२ व २०२३ मध्ये घरफोडी व गंभीर चोरी यासारखे ५१ गुन्हे दाखल झाले होते. या गुन्ह्यांचा तपास करून चोरीला गेलेला मुद्देमाल गुन्हेगारांकडून हस्तगत केला आहे. त्यात तीन चारचाकी वाहने, तीन रिक्षा, आठ दुचाकी, १५ मोबाईल, सोन्याचे दागिने, रोख रक्कम व अन्य मौल्यवान वस्तूंचा समावेश असून त्याची किंमत एक कोटी सात लाख ५१ हजार ९८० इतकी आहे. यावेळी आयुक्त मधुकर पांडे, उपायुक्त जयंत बजबळे तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

Mumbai, Palghar-Today
25/01/2023 Page No. 2

CamScanner